वाचले–

१) जाहीरात क्र.ब-२- १२४६ वायसीएमएच/७/कावि/२५२/२०१८,दि.२६/०४/२०१८.

२) निवड समितीने शिफारस केलेली निवड व प्रतिक्षा यादी.

३) आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/३०६/२०१८ दिनांक १९/०५/२०१८

४) आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/३५८/२०१८ दि.०७/०६/२०१८

५) मा. अति. आयुक्त यांचेकडील दि.०२/०७/२०१८ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/४१०/२०१८
दि.- ०२/०७/२०१८.

विषय- यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात सहा महिनेकरीता प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना स्टाफनर्स (GNM) या पदावर नियुक्ती आदेश देणेबाबत....

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये रुग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले स्टाफनर्स पदे एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता भरणेकरीता उपरोक्त १ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करणेत आली असता सदर पदाकरीता आलेले सर्व अर्जांची छाननी करुन उमेदवारांच्या लेखी परिक्षा दि.०६/०५/२०१८ रोजी घेण्यात आलेल्या आहेत. दक्षता विभागाने उत्तरपत्रिका तपासणी करून दिलेल्या गुणवत्ता यादीनुसार वाचले क्र.२ अन्वये निवडसमितीने गुणवत्ता व आरक्षणानुसार उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार केलेली आहे. निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागेवर प्रथम निवड झालेल्या ९० उमेदवारांना स्टाफनर्स पदावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता मानधनावर उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये नियुक्ती देणेत आलेली आहे. सदर उमेदवारांनी नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या विहित मुदतीत रुजू होणे अपेक्षीत होते परंतु मुदतीत फक्त ६९ स्टाफनर्स रुजू झालेल्या आहेत. उर्वरीत २२ स्टाफनर्स रूजू न झाल्याने त्या रिक्त जागेवर प्रतिक्षा यादीतील २२ स्टाफनर्सना उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या २२उमेदवारांपैकी १४ स्टाफनर्स विहित मुदतीत रूजू झालेल्या आहेत. उर्वरीत रिक्त जागेवर प्रतिक्षा यादीतील सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनधनावर तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या तारखेपासून स्टाफनर्स (GNM) या पदावर नियुक्ती आदेश देणे आवश्यक आहे. .

सबब निवड समितीने सादर केलेल्या निवड यादीनुसार व केलेल्या शिफारशीप्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्र-'अ मधील उमेदवारांना एकत्रित मानधनावर दि. ०२/०७/२०१८ ते दि. १८/११/२०१८ अखेर खालील अटी व शर्तीस अधीन राहुन तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात आदेशाचे तारखेपासून नेमणुक देणेस मी अति. आयुक्त (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ या आदेशान्वये मंजुरी देत आहे. सदर कर्मचा-यांना देण्यात येणारे एकत्रीत मानधन हे सोबतचे प्रपत्र अ मध्ये त्यांच्या नावापुढे दर्शविण्यात आलेले आहे.

अटी व शर्ती –

१) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर सेवा समाप्तीबावत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत. प्रस्तृतची मुदत संपल्यानंतर त्याचा या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकराचा हक्क व दावा राहणार नाही.

२)नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल त्याप्रमाणे त्यांच्या सुचनांचे,निदेशांचे वेळोवेळी पालन करावे लागेल व वेळोवेळी वरीष्ठ सांगतील ती कामे करावी लागतील.

३)नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महीना आगाऊ विनंतीपत्र द्यावे लागेल. तशी पत्र न दिल्यास त्यांच्याकडुन एक महीन्याचा मेहनताना वसुल करण्याचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४)नियुक्ती कालावधीत विनापरवाना, विनासुचना गैरहजर राहिल्यास, तसेच कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्दशनात आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहतील.

५) मानधनावरील कर्मचारी यांना ६ महीन्यातुन फक्त ४ दिवस किरकोळ रजा मिळेल आणि ही किरकोळ रजा ज्या त्या महीन्यातच घ्यावी लागेल. अशी रजा संचयीत करुन एकत्रीतरित्या घेता येणार नाही. मात्र अपावादात्मक परिस्थितीमध्ये अशा प्रकारे रजा देणेबाबत नियंत्रित अधिकारी यांना शिफारस करता येईल. अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत ही रजा पुढच्या महीन्यात देणेबाबत विभाग प्रमुखांना अधिकार राहतील.

६)कितीही दिवस एकत्रीत सेवा झाली तरी मानधना व्यतिरिक्त वेतनवाढ अथवा अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. तसेच रजा प्रवास भत्ता, सानुग्रह, अनुदान व बोनस देय राहणार नाही.

७)नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधाने कोणत्याही प्रकारचा हक्क,दावा राहणार नाही. अशी सेवा एकुण(Aggregate)कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरुपाची नेमणुक आपोआप मिळणार नाही.

८)आवठ्यातुन फक्त एक दिवस रुग्णालयाच्या सोयीनुसार साप्तहिक सुट्टी राहील व सार्वजनिक सुट्टीचे /राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी म्हणजेच ज्या सुट्टीच्या दिवशी बाह्यरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्यादिवशी सुट्टी उपभोगता येईल व सदरची सुट्टीच्या दिवशी बाह्यरुग्ण चालु असेलतर पर्यायी रजा रुग्णालयाच्या सोयीनुसार देता येईल.

९)मानधनावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायम पदी नेमणुकीच्या हक्क राहणार नाहीव तशी आस्थापनेवर वेतन श्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाब आणणार नाही. कोणत्याही मा.न्यायालयात दावा करता येणार नाही.

१०)सदर स्टाफनर्स यांनी उपस्थितीसाठी बायोमेट्रीक पद्धतीचा वापर करणे व हजेरी मस्टरवर दररोज स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील. हजेरी मस्टरवरती सही व थंम्ब ईंप्रेशन करणे बंधनकारक राहील ज्या दिवसाची बायोमेट्रीक नोंद नसेल त्या दिवसाचे मानधन अदा केले जाणार नाही

११) नियमाप्रमाणे मानधनातुन आयकर (TDS) वजा करुन अंतिम रक्कम अदा करणेत येईल.

१२)कामावर वेळेवर हजर राहुन ओळखपत्र व गणवेश परिधान करणे. तसेच वॉर्ड इनचार्ज व नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१३)रुजु झालेवर रुजु अहवाल व फोटो तसेच १५ दिवसाचे आत बँक ऑफ बडोदा.पी.सी.एम.सी.मध्ये खाते उघडुन त्याचा क्रमांक व पॅन कार्डची झेरॉक्स संबधीत पगार लिपिकाकडे चाणक्य कार्यालयमध्ये सादर करावी.

१४)अर्जाबरोबर जे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तेच ग्रह्य धरले जाईल.नंतर दिलेला किंवा नंतर वाढलेला अनुभव ६ महिने पुर्ण होईपर्यंत ग्राह्य धरला जाणार नाही.

१५)आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत रुजु न झालेस सदरची नेमणुक रद्द करण्यात येईल.त्यानंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

**प्रति,**

श्री/श्रीम.--------------------------------------------
यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

अति. आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

**प्रत,**

१) लेखा विभाग
२) सर्व्हर रुम
३) मेट्रन कार्यालय/ओ.टी. विभाग
४) राजीव गांधी जीवनदायी योजना
५) संबधीत पगार लिपीक

२/- माहीतीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी .

**वैद्यकिय अधिक्षक**
यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

~~पिंपरी~~ चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयकडील जाहिरात क्र. ०२, १२४६ वायसीएमएच/७/कावि/२५३/२०१८ दि.२६/०४/२०१८ अन्वये रूग्णालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात विविध पदांकरीता निवड समितीने शिफारस केलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश

(नेमणुक कालावधी दि.०२/०५/२०१८ ते दिनांक १८/११/२०१८)

प्रपत्र 'अ'

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती पदनाम | एकूण मानधन र. रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. देवयानी अशोक सावरे | खुला प्रतिक्षा निवड - १२ | स्टाफनर्स | २००००/- |
| २ | श्रीम. शिला मेश्राम | खुला प्रतिक्षा निवड - १३ | स्टाफनर्स | २००००/- |
| ३ | श्रीम. रागिनी महादेव माने | खुला /विजा प्रतिक्षा निवड - १४ | स्टाफनर्स | २००००/- |
| ४ | श्रीम.निशा दिलीप पारधे | खुला अनु-जाती प्रतिक्षा निवड-१५ | स्टाफनर्स | २००००/- |
| ५ | श्रीम. ऐश्वर्या ज्ञानोबा सावंत | खुला अनु-जाती प्रतिक्षा निवड-१६ | स्टाफनर्स | २००००/- |
| ६ | श्रीम. राजश्री वैजीनाथ करपे | खुला प्रतिक्षा निवड- १७ | स्टाफनर्स | २००००/- |
| ७ | श्रीम. पुनम हिरा गावित | अनुसुचित जमाती- प्रतिक्षा निवड-४ | स्टाफनर्स | २००००/- |

आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/४९४/२०१८
दिनांक. ०२/०५/२०१८

अति. आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८